**नि.फौ.के. नं. ११५/२०२५**
**महाराष्ट्र शासन वि. शंकर**
**निशाण क्र. ३४**

**(प्रस्तुत प्रकरणातील आरोपी हा न्यायालयीन कोठडीमध्ये आहे. सदर आरोपीस रत्नागिरी मध्यवर्ती कारागृह यांचेकडुन व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे हजर करण्यात आले. सदर व्हीडीओ कॉलची आवाज प्रेक्षपणाचा दर्जा तपासुन पाहण्यात आला असुन तो चांगला आहे. सदर आरोपी व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे हजर असताना त्याचेसमक्ष साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात येत आहे.**

**सबब, सदर साक्षीदाराची साक्ष खालील प्रमाणे नोंदविण्यात येत आहे.)**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०६ यांचा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – विवेक श्रीधर रसाळ,
**वय –** ४४ वर्षे, **व्यवसाय** – नोकरी (पो.हे.कॉ.२६२),
**राहणार –** स्थानिक गुन्हे अन्वेषन शाखा, रत्नागिरी, जि. रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून –**

**०१**. दिनांक ११/११/२०२५ रोजी मी स्थानिक गुन्हे अन्वेषन शाखा, रत्नागिरी, जि. रत्नागिरी येथे कार्यरत होतो. संगमेश्वर पोलीस ठाणे येथील गुन्हा नोंदणी क्र. ११७/२०२५, भारतीय न्याय संहितेचे कलम ३३१(४) व ३०५(अ) अन्वये, दाखल गुन्हयाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे अन्वेषन शाखा, रत्नागिरी, जि. रत्नागिरी यांच्याकडुन सुरु होता. घटनास्थळावरील सी.सी.टी. फुटेजच्या व मोबाईलमधील सिमकार्ड लोकेशनच्या आधारे सदरचा मोबाईल व त्यातील सिमकार्ड हा प्रेम डुकरे,

राहणार – शहापुर, मुरबाड रोड हा वापरत असल्याचे व सदरचे मोबाईलचे लोकेशन शहापुर, मुरबाड या ठिकाणी असल्याचे दिसुन आले. त्या अनुषंगाने मी, पो.हे.कॉ./९०९ श्री. आंबेकर, पो.शि. श्री. दिपराज पाटील, चालक अतुल कांबळे असे आम्ही आवश्यक ते साहित्य घेवुन शासकीय वाहन क्र. एमएच–०८–बीई–०१७३ मधुन दिनांक ११/११/२०२५ रोजी रत्नागिरी येथुन निघुन शहापुर, जि. ठाणे येथे आलो. मोबाईल लोकेशनच्या आधारे सदरचे ठिकाण शुन्द्रुण बुद्रुक, ता. शहापुर, जि. ठाणे येथे असल्याचे कळाले. त्याआधी आम्ही किन्हवली पोलीस ठाणे ग्रामीण येथे गेलो होतो. त्यानुसार सदरचे पोलीस ठाण्यात ठाणे दैनंदिनीला नोंद घेण्यात आली.

**०२**. मिळाल्या माहितीच्या व सी.सी.टी. फुटेज आधारे आम्ही शुन्द्रुण बुद्रुक, ता. शहापुर, जि. ठाणे येथे आलो असता, २२:०० वाजण्याच्या सुमारास आम्हाला आरोपी मिळुन आला. त्याला आम्ही त्यांचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव – शंकर अर्जुन पाटील उर्फ शंकर अर्जुन साळुंखे, राहणार – कर्जत असे सांगितले.

**०३**. आम्ही त्याच्याकडील विवो कंपनीचा वाय – ३१, प्रो – ५जी मोबाईलची तपासणी केली असता, संगमेश्वर पोलीस ठाणे, गुन्हा क्रमांक ११७/२०२५ मधील चोरीला गेलेल्या मोबाईलचा व त्या मोबाईलचा आयएमईआय क्रमांक सारखे असल्याचे दिसुन आले. विचारणा केल्यावर त्याने सदरचा मोबाईल संगमेश्वर एस.टी.स्टँड समोर मोबाईल दुकानातुन चोरी केल्याचे सांगितले. तसेच पुढे त्यांनी राजापुर पोलीस ठाण्याच्या हद्दीतुन एक दुचाकी चोरी केल्याचे सांगितले. त्यानंतर, दोन पंचांना बोलावुन घेवुन त्यांच्यासमक्ष सदरचा मोबाईल जप्त करुन तसा पंचनामा माझ्यासमक्ष पो.हे.कॉ.श्री. आंबेकर यांनी केला. *(साक्षीदाराला वस्तु – ड कडील मोबाईल दाखविण्यात आला). तो तोच आहे.* त्यावेळी मी ई–साक्षमध्ये व्हीडीओग्राफी व फोटोग्राफी केली आहे. त्याबाबत मी भारतीय साक्ष अधिनियमाचे कलम ६३(४)(सी) अन्वये, प्रमाणपत्र दिले होते. *(साक्षीदारास सदरचे प्रमाणपत्र दाखविण्यात आले). ते तेच असुन त्यावर माझी*

*स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. सदर प्रमाणपत्रात असलेल्या छायाचित्रात मी, आरोपी, पो.हे.कॉ.श्री. आंबेकर, पो.शि. श्री. पाटील व दोन पंच असे दिसुन येत आहोत. (सदर दस्ताला **निशाणी क्रमांक ३५** देण्यात येते).*

**०४.** सदर आरोपीने उर्वरीत मुद्देमालाबाबत कोणतीही उत्तरे दिली नसल्याने त्याला आम्ही जप्त मुद्देमालासह संगमेश्वर पोलीस ठाणे येथे घेवुन येवुन संगमेश्वर पोलीस ठाण्याकडे जमा केले.

**०५.** आरोपीला दाखविल्यास मी ओळखु शकतो. आज रोजी व्ही.सी.वरुन दिसत असलेला आरोपी हा तोच आहे.

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास — आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. आर. एस. जोशी यांच्याकडून** –

**०६.** मी मागील ०४ वर्षांपासुन स्थानिक गुन्हे अन्वेषन शाखा, रत्नागिरी येथे कार्यरत आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्रमांक ३५ कडील प्रमाणपत्रात नमुद असलेले घटनास्थळाचे अक्षांश व रेखांश मी केलेल्या व्हीडीओग्राफीमध्ये त्याच अक्षांश व रेखांशाचे घटनास्थळ असणे आवश्यक आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी ई–साक्षमध्ये केलेले व्हीडीओग्राफी व फोटोग्राफी योग्यरित्या झाले आहे, याबाबतचे माझ्या वरीष्ठांचे खात्री केलेले प्रमाणपत्र यासोबत जोडलेले नाही. साक्षीदार पुढे सांगतो की, तशी कोणतीही आवश्यकता नसुन तशी प्रक्रिया नाही. हे म्हणणे खरे नाही की, तशी कोणतीही आवश्यकता नसुन तशी प्रक्रिया नाही, हे मी खोटे कथन करीत आहे.

**०७.** हे मला माहिती नाही की, ई–साक्ष प्रणाली, मा.ना.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या नियंत्रणाखाली येते. हे म्हणणे खरे आहे की, मोबाईल जप्तीच्या पंचनाम्यावर माझी कोठेही स्वाक्षरी नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी ई–साक्षमध्ये केलेले व्हीडीओग्राफी व

फोटोग्राफीची प्रत आरोपीला देण्यासाठी मी संबंधीत तपासीक अधिकारी यांच्याकडे जमा केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, घेतलेल्या छायाचित्रांमध्ये बदल करण्याची सुविधा माझ्या सदर मोबाईल ॲपमध्ये आहे. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्रमांक ३५ कडील प्रमाणपत्र खोटे व बनावट दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझा मोबाईल सुस्थितीत नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावरील सी.सी.टी. फुटेजच्या व मोबाईलमधील सिमकार्ड लोकेशनच्या आधारे तथाकथीत ठिकाणी जावुन पंचनाम्याची मी व्हीडीओग्राफी व फोटोग्राफी केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकुर मी खोटा कथन केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.05.08 18:04:07 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिनांक ०८/०५/२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

स्थळः देवरुख जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 08/05/2026 |
| Evidence signed by PO. on | :- | 08/05/2026 |
| Evidence uploaded on | :- | 08/05/2026 |